# महात्मा गांधीजींचा सामाजिक विचार

**प्रा. अशोक आलगोंडी,** सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, शिवानंद महाविद्यालय, कागवाड. (कर्नाटक)

---

**प्रस्तावना :**

भारतातील सामान्यातल्या सामान्य माणसाला स्वातंत्र्य चळवळीमध्ये आणण्याचे महान कार्य महात्मा गांधीजींनी केले. भारतात विविध जाती-धर्म, भाषा, आचार-विचार, संस्कृतीचे लोक राहतात. अशा सर्वांची एकजूट बांधून पाठिंबा मिळवणे अत्यंत कठीण काम होते. गांधीजींनी सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण असलेल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून नव्या भारताच्या निर्मितीचे त्यांचे स्वप्न पूर्णत्वाला नेण्यास त्यांनी प्रचंड प्रयत्न केले. सरकार मुक्त समाज साध्य केल्याशिवाय व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही असे त्यांचे मत होते. अशा समाजात प्रत्येक व्यक्तीमध्ये विवेकी स्वायत्तता असते. इतकेच नाही तर कोणताही भेदभाव न करता आर्थिक, सामाजिक समन्वय ठेवून समरसतेचा समाज असतो. जिथे कष्टाला (श्रमाला) अत्यंत महत्व असते. देश समजून घेण्यासाठी गांधीजींनी भारत भ्रमण केले. गांधीजींचे लक्ष भारतीय समाजातील विघातक आणि वाईट गोष्टींकडे गेले. ज्यांच्यामुळे संपूर्ण समाजाची मुळे ठिसूळ झाली होती. भारतीय समाज आणि संस्कृती ही जगातील महान संस्कृतींमध्ये गणली जात असली तरीही चांगल्या परंपरांच्या जागी सामाजिक दुष्कृत्यांचा वरचष्मा होता. समाजाला एक संघटित आणि सुव्यवस्थित स्वरूप प्रदान करण्यासाठी वैदिक आणि आर्य काळात अनेक व्यवस्था आणि परंपरा स्थापित केल्या गेल्या.

विसाव्या शतकाचा पूर्वार्ध भारतीय समाजासाठी खूप महत्त्वाचा होता. कारण महात्मा गांधींनी समाजाला दुष्कृत्यांपासून मुक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. गांधीजींपूर्वीही अनेक समाजसुधारकानी तसा पुढाकार घेतला होता. पण गांधींचे प्रयत्न वास्तवावर आधारित असल्यामुळे त्यांच्या विचारांवर सकारात्मक परिणाम झाला. त्यावेळी समाजात उच्च-नीच भेदभाव शिगेला पोहोचला होता आणि कथितपणे स्वतःला उच्च जातीचे म्हणवून घेणारे लोक कथितपणे खालच्या जातीतील लोकांशी अस्पृश्यता, शोषण, अन्याय आणि अत्याचारासारखे अमानुष वर्तन करत होते. त्यामुळे समाज दुभंगलेला दिसत होता. म्हणून गांधीजींनी राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्यासाठी सामाजिक सुधारणेवर भर दिला आणि सांगितले की, जोपर्यंत समाजात एकतेचा अभाव आहे, तोपर्यंत आपण गुलामगिरीच्या साखळीतून मुक्त होऊ शकत नाही.

**उद्देश** :

१) महात्मा गांधीजींचा सामाजिक सुधारणेचा विचार अभ्यासणे.

२) नव भारताच्या निर्मितीसाठी गांधीजींनी सुचवलेल्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.

३) धर्मनिरपेक्ष देशाच्या उभारणीला सहाय्यभूत ठरणारी गांधीजींची सामाजिक भूमिका पडताळून पाहणे

महात्मा गांधींनी राजकीय भूमिकेसोबतच इतरही काही महत्वाच्या भूमिका घेतल्या. सामाजिक भूमिका ही त्यापैकीच एक प्रमुख होय. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने समाजाची चार शकले पाडली आहेत. यामध्ये उच्च नीच भेदाभेद पराकोटीचा असल्याने समाजातील एक मोठा घटक अनेक गोष्टींपासून वंचित राहिला. परिणामतः देशाचा सामाजिक विकास होऊ शकला नाही. त्यामुळे महात्मा गांधींनी हा भेद नष्ट करण्याचे कार्यक्रम हाती घेतले. हे कार्यक्रम म्हणजेच त्यांचा एकेक सामाजिक विचार आहे असे म्हणता येईल.

**अस्पृश्यता निवारण :**

गांधीजींनी भारतीय समाजात प्रचलित असलेल्या अस्पृश्यतेला विरोध केला. अस्पृश्यता ही समाजाच्या अधोगतीला कारणीभूत ठरत असून हा मानवी समाजाचा गंभीर दोष आहे असे त्यांचे मत होते. अस्पृश्यांना आर्थिक आणि राजकीय अधिकार देण्याच्या ते समर्थनात होते. गांधीजींनी अस्पृश्यता निवारण करण्याला अग्रक्रम दिला होता. यासाठी त्यांनी आपल्या आश्रमात दलितांना प्रवेश दिला. त्यांच्या या भूमिकेला त्यांच्याच सवर्ण हितचिंतकांनी विरोध केला. असे असले तरी त्यांनी आपली भूमिका बदलली नाही. आपल्या भूमिकेवर ठाम राहिले.

महात्मा गांधीजी ज्या गावात जात त्यावेळी ते भंगी कॉलनीत राहात. त्यांचे अन्न खात. वंचित समाजातील लोकांचे जीवन समजून घेण्याचा ते प्रयत्न करत असत.

**दलितांना मंदिरात प्रवेश देण्याचा प्रयत्न :**

अस्पृश्यांना हिंदू मंदिरे, विहिरी आणि सार्वजनिक ठिकाणी प्रवेश द्यावा जेणेकरून त्यांच्यात स्वाभिमान आणि स्वाभिमानाची भावना विकसित होईल यावर त्यांनी जोर दिला. गांधीजींनी अस्पृश्यांसाठी सर्वप्रथम 'हरिजन' हा शब्द वापरला. १९३१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक ययेथील काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. दलितांना मंदिर प्रवेश मिळावा अशी त्यांनी मागणी केली. गांधीजींनी हाच मुद्दा उचलून धरला आणि पुढे १९३४ साली याच प्रश्नासाठी देशभर दौरा काढला. दलितांना मंदिर प्रवेश मिळाला पाहिजे हा मुद्दा त्यांनी स्वातंत्र्य चळवळीशी जोडला.

**महिला सुधारणा :**

समाजात स्त्रियांना मूल्यवर्जित जीवन जगावे लागते. ही स्थिती देश हिताच्या दृष्टीने घातक असल्याचे गांधीजींचे मत होते. महिला कोणत्याही प्रकारे पुरुषांपेक्षा कमी नसून त्यांच्यावर अन्याय आणि अपमान होता कामा नये असे त्यांनी भूमिका घेतली. सत्य, अहिंसा, सहिष्णुता, नैतिकता इत्यादी जीवनातील सर्वोच्च गुणांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर स्त्री पुरुषांपेक्षा श्रेष्ठ आहे असे त्यांचे विधान होते. गांधीजींनी पडदा पद्धत, बालविवाह, बहुपत्नीत्व, हुंडा पद्धत इ. यांना विरोध केला.

**हिंदू- मुस्लिम ऐक्याचा आग्रह :**

स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यक्रमातून त्यांनी नेहमीच हिंदू-मुस्लिम ऐक्याचा आग्रह धरला. दोन धर्मात भांडण लावून देशाचे तुकडे पाडणे ही ब्रिटीशांची रणनीती होती. त्यामुळे समाजात जातीय दंगली भडकवल्या जायच्या. गांधीजी मात्र या जातीय दंगली होऊ नयेत यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले. याचाच भाग म्हणून त्यांनी हिंदूसह मुस्लिम समाजातील अनेक लोकांना स्वातंत्र्य चळवळीत आणले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय झालेल्या मुस्लिम नेत्यांची संख्या देखील मोठी आहे.

**गांधीजींचा जमीनदारीला विरोध :**

देशातील जमीनदारांकडे असलेली अतिरिक जमीन शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे अशी भूमिका गांधीजीनी सुरुवातीपासून घेतली होती. म्हणून ते म्हणत की, संस्थानिकांनी आपापली संस्थाने बरखास्त करून देशात विलीन करावीत. जाहीरपणे त्यांनी ही भूमिका मांडली. त्यामुळे संस्थानिक गांधीजींवर नाराज होते. शेत जमिनीचे छोटे छोटे तुकडे होण्यापासून रोखण्यासाठी शेतीचा नवा प्रयोग त्यांनी सुचविला. सहकारी पद्धतीने शेती करण्यावर त्यांनी भर दिला.

**धर्मनिरपेक्ष देश :**

गांधीजी स्वतःला मी धर्माने हिंदू असल्याचे म्हणत. पण माझा हा धर्म व्यक्तिगत जीवनातला आहे असेही त्यांचे म्हणणे होते. सार्वजनिक जीवनात त्यांनी आपला धर्म कधीच आणला नाही. त्यांचे मत असे होते की माणूस व्यक्तिगत जीवनात धार्मिक असावा पण तो त्याच्या सामाजिक जीवनात येता कामा नये. हीच त्यांची भूमिका धर्मनिरपेक्ष देशाबाबत होती. देशाला धर्म असता कामा नये अशीच त्यांची भूमिका होती. गांधीजी कधीही मंदिरात गेले नाहीत. कोणत्याही प्रकारच्या कर्मकांडाला त्यांनी जीवनात स्थान दिले नाही. किंवा कर्मकांडाला थारा दिला नाही.

**आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन :**

महात्मा गांधीजी आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते होते. सामाजिक सुधारणांचा एक भाग म्हणून त्यांनी विवाह सोहळे साधेपणाने केले जावे जावेत असा विचार मांडला. कमीतकमी खर्च विवाहांवर केला जावा ही त्यांची भूमिका होती. आंतरजातीय विवाहाबाबत ते किती आग्रही होते, हे एका उदाहरणावरून स्पष्ट करता येईल. त्यांचे मानसपुत्र आणि स्वीय सचिव महादेवभाई देसाई आपला चिरंजीव नारायनभाई याच्या लग्नाची पत्रिका देण्यासाठी आले असता त्यांना गांधीजींनी विचारले की, 'महादेव कन्या अपल्यातलीच आहे की दुसऱ्या जातीची?' यावर

महादेवभाई म्हणाले की, 'कन्या अपल्यातलीच आहे.' हे ऐकताच 'या लग्नाला मी येणार नाही.माझे आशीर्वाद आहेत समजा.' अश्या शब्दात थेट नकार दिला. आपल्याच जातीत लग्न करणाऱ्या महादेवभाईच्या मुलाच्या लग्नाला न जाणारे गांधीजी आपण समजून घेतले पाहिजेत.

**मूलभूत शिक्षण :**

गांधीजी म्हणाले की शिक्षणाचे उद्दिष्ट मानवी शरीर, आत्मा आणि मन यांचा एकत्रित विकास आहे. परंतु या दृष्टिकोनातून ब्रिटिशांनी भारतात चालवलेले शिक्षण योग्य नव्हते. ते म्हणाले की, ही शिक्षण पद्धती आपल्या तरुणांची शारीरिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक प्रगती करू शकत नाही. शिक्षणांतर्गत विद्यार्थ्यांना कोणती ना कोणती कौशल्ये शिकविली जावीत. जेणेकरून ते स्वावलंबी होतील. इतकेच नाही तर शिक्षण मातृभाषेतून देण्यात यावे. मूलभूत शिक्षणाची सोय सरकारने मोफत आणि अनिवार्य करावे अशी त्यांची भूमिका होती.

**समारोप :**

महात्मा गांधीजींच्या सामाजिक भूमिका अनेक सांगता येतील. पण या काही त्यातील प्रमुख आहेत. समाजातील प्रत्येक घटकाचा त्यांनी विचार केलेला दिसतो. त्यांच्या या विचार भूमिकेतून त्यांनी राजकारण केल्याने भारतासारख्या विविध जाती-धर्म, भाषा, प्रांतात विभागलेल्या देशातील जनतेला एकत्रित बांधून ठेऊन स्वातंत्र्य चळवळीत आणणे शक्य झाले. गांधीजींच्या नव भारत संकल्पनेत बंधुता, समानता आणि शैक्षणिक प्रगती याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोणत्याही देशाची प्रगती त्या देशाच्या सामाजिक संरचनेवर आधारलेली असते. अशावेळी महात्मा गांधीजींचे विचार मार्गदर्शक ठरतात.

**संदर्भ :**

- Mahatma Gandhi in Changing Time - Dr. M.Raghib Deshmukh, Deshmukh Publication pvt ltd., Buldhana
- content://com.android.chrome.FileProvider/offline-cache/c5db8bbb-d3d9-4127-96ce-8eb0841aa3b1.mhtml
- महात्मा गांधींचा खून कुणी केला? का केला? - आनंद मेणसे, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, ३० जानेवारी २०१८
- गांधी: पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा - रावसाहेब कसबे, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०२०
- महात्मा गांधी आणि विश्वस्त संकल्पना - डॉ. पी.बी.कुलकर्णी, सप्ता. साम्यवादी दिवाळी २०१८